महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१.
Web:www.dhepune.gov.in E-mail : law.dhepune@nic.in
फोन नं. ०२०/२६०५१७२९,२६१२२११९,२६०५१५१२, फॅक्स नं.०२०/२६१११११५३

क्रमांक-उशिसं/बी.एड/प्र.क्र.६२-१८/सीईटी सेल/५६०६ दिनांक : ११/०५/२०१८

**परिपत्रक : -**

**विषय : बी.ए.बी.एड./बी.एस्सी.बी.एड. (एकात्मिक ४ वर्ष) अभ्यासक्रमाच्या राज्य सामाईक प्रवेश परीक्षेचा ऑनलाईन अर्ज भरणेसाठी विद्यार्थ्यांना सहाय्य करणेबाबत.**

उपरोक्त विषयी, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राज्यातील अशासकीय अनुदानित / विना अनुदानित / कायम विना अनुदानित/ विद्यापीठ संचलित विभाग/ शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील बी.ए.बी.एड./ बी.एस्सी.बी.एड. (एकात्मिक ४ वर्ष) अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाचे प्रवेश हे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांमधून केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांचेमार्फत होणार आहेत.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये राज्यातील उक्त नमूद अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (CET) देणे आवश्यक आहे. सदरहू परीक्षेचा ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत दि. ११.०५.२०१८ ते ११.०६.२०१८ अशी आहे. ऑनलाईन अर्ज करण्यासाठीची लिंक, माहिती पुस्तिका व वेळापत्रक www.dhepune.gov.in व www.mahacet.org या संकेतस्थळावर CET CELL या सदराखाली उपलब्ध आहे.

सर्व शिक्षणशास्त्र महाविद्यालयांस याद्वारे सूचित करण्यात येते की -

१. उपरोक्त अभ्यासक्रमाच्या सीईटी परीक्षेच्या वेळापत्रकास आपल्या कार्यक्षेत्रामध्ये निशुल्क व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात यावी.
२. सीईटी परीक्षेचे वेळापत्रक व त्यासंबंधीच्या सर्व सूचना आपल्या महाविद्यालयातील नोटीस बोर्डवर तसेच महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात याव्यात.
३. बी.ए.बी.एड./ बी.एस्सी.बी.एड. (एकात्मिक ४ वर्ष) अभ्यासक्रमास प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांस राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (CET) देणेबाबत आवश्यक माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.
४. महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करणेसाठी एक संगणक आवश्यक त्या सुविधेसह उपलब्ध करुन देण्यात यावा.

(कृ.मा.प.)

५. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (CET) २०१८ चा अर्ज भरतेवेळी विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींवर समुपदेशन करण्यासाठी आपल्या महाविद्यालयातील एका तज्ञ व्यक्तीची समन्वयक म्हणून नेमणूक करण्यात यावी.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाद्वारे राज्यातील प्रमुख वर्तमानपत्रामध्ये सीईटी परीक्षेबाबतची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून आपणही आपल्या स्तरावर सीईटी बाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता निर्माण करुन सीईटी परीक्षेचा अर्ज भरणेसाठी आवश्यक ते सहाय्य करावे.

**( डॉ. मोहन खताळ )**
सहसंचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत कार्यवाहीस्तव -

१. प्राचार्य, महावीर महाविद्यालय, कोल्हापूर,
२. प्राचार्य, अशोका एज्यकेशन सोसायटीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक,
३. प्राचार्य, लायन जुहू नंदलाल जालन महिला महाविद्यालय मंगलयंतन, मुंबई,
४. प्राचार्य, महाराष्ट्र कॉस्मोपोलिटन सोसा.चे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पुणे,
५. प्राचार्य, कर्मवीर हिरे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कोल्हापूर,
६. विभागप्रमुख, शिक्षणशास्त्र विभाग, सावित्रीबाई पुणे विद्यापीठ, पुणे,
७. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

२/- यांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक आपल्या कार्यक्षेत्रातील संबंधित महाविद्यालये व अकृषि विद्यापीठे यांना निर्गमित करुन कार्यवाही करणेबाबत आवश्यक सूचना देण्यात याव्यात.

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

१. मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२,
२. मा. आयुक्त राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, अली यावर जंग मार्ग, वांद्रे, मुंबई - ५१.